''कृपया प्रसिध्दी करिता

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
२६/०२/२०२६

# पुणे महानगरपालिका

## प्रेस नोट

## जाहिर आवाहन

---

पुणे महानगरपालिका अधिकार क्षेत्रास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चा कायदा लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र ) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ , महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे )वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम २००९ व मे. उच्च न्यायलय, मुंबई यांचे दिनांक २० सप्टेंबर २०१३ रोजीच्या आदेशान्वये वृक्ष प्राधिकरणाचे कामकाज करण्यात येते.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र ) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम २०२१ या कायद्यानुसार विना परवाना झाडे जाळणे, तोडणे किंवा कोणत्याही प्रकारे झाडास हानी पोहचवणे असे कोणतेही कृत्य करणे हा गुन्हा आहे. अश्या गुन्हास "शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा पद्धतीचा वापर करून काढलेल्या मुल्याइतके परंतु एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रक्कमेच्या दंडाची शिक्षा आहे. "

शहरातील सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते कि, होळी सणाच्या निमित्ताने होळीकरिता कोणत्याही वृक्षांची तोड करू नये.कोणतीही व्यक्ती विनापरवाना वृक्षतोडीत असल्यास किंवा वृक्षांचा विस्तार कमी करीत असल्यास, कृपया संबधित क्षेत्रीय कार्यालयाचे मा.महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी /वृक्ष प्राधिकरण कार्यालय,पुणे महानगरपालिका,यांचेकडे तक्रार करावी किंवा टोल फ्री क्रमांक - १८००१०३०२२२,व्हॉटस ॲप क्रमांक ९६८९९०००० २यावर किंवा www.complanit.punecorporation.org या तक्रार पोर्टलवर अथवा सहाय्यक उद्यान अधीक्षक, श्री.रत्नाकर करडे, मो.नं. ९६८९९३८५२३ यांचेशी संपर्क साधावा.

२५/०२

(डॉ.अशोक दि.घोरपडे )
सह महापालिका आयुक्त तथा
मुख्य उद्यान अधिक्षक तथा
सदस्य सचिव,वृक्ष प्राधिकरण
पुणे महानगरपालिका

"वृक्ष आपुले जीवन साथी,जीवन आपुले त्यांच्या हाती"